**मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार, खसारा क्र. ३०७ मौजा- हरदौली तहसील- तुमसर जिल्हा-भंडारा महाराष्ट्र-४४१९१२ मॅगनिज उत्पादन विस्तारित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त दि. १५/०९/२०२२. दु. १:०० वा.**

मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग या कंपनीव्दारे मौजा- हरदौली ता. तुमसर जि. भंडारा येथे प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १४.०९.२०२२ रोजी दुपारी १.०० वा. मौजा- हरदौली तह. तुमसर जि. भंडारा येथे आयोजित करण्यात आली. सदर लोकसुनावणी श्रीमती. बी. वैष्णवी (भा.प्र.से.) उप-जिल्हा दंडाधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर, यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागपूर हे सदस्य लोकसुनावणी समिती तसेच श्रीमती हेमा देशपांडे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, भंडारा यांनी लोकसुनावणीच्या समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. श्री. बी. डी. टेळे तहसीलदार तुमसर हे उपस्थित होते. जनसुनावणीत सुमारे ५० जण सहभागी झाले होते. उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग यांनी दिनांक १५/०७/२०२२ च्या पत्राद्वारे मौजा- हरदौली तह. तुमसर जि. भंडारा येथील प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तारिकरणाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याचा प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाकडे सादर केला. सदर प्रकल्पास पर्यावरण व वातावरणीय बद्दल मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र यांचेकडून पर्यावरण विषयक मंजुरी आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यालयाने, १५/०७/२०२२ रोजी ई-मेलद्वारे सार्वजनिक सुनावणी प्रक्रिया पारित करण्यास मान्यता दिली.

१४ सप्टें २००६ च्या EIA अधिसूचनेनुसार, १/१२/२००९ व ०९ मे २०२२ मध्ये सुधारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्थळ, तारीख आणि वेळ जिल्हाधिकारी भंडारा यांच्या मंजुरीने निश्चित करण्यात आली. म.प्र.नि.मंडळच्या क्र. MPCB/BO/JD (WPC)/PH/B- २२०९०७ एफटीएस-००७५ दि. ०७/०९/२०२२ नुसार १४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, यांच्या प्रकल्पस्थळी घेण्यात आली. (प्रत संलग्न).

सदर पर्यावरणा विषयक लोकसुनावणीची जाहिरात इंग्रजी दैनिक "द हितवाद" आणि मराठी दैनिक "तरुण भारत" मध्ये दिनांक १३/०८/२०२२ रोजी संबंधितांना अभ्यासण्यासाठी हरकती, सूचना इत्यादी प्राप्त करण्यासाठी प्रकाशित करण्यात आली होती. (प्रत संलग्न).

सदर प्रकल्पाचा तसेच म.प्र.नि. मंडळाच्या संकेत स्थळावर प्रकल्पाबाबत प्रश्न, शंका, सूचना, आक्षेप, निवेदन असल्यास लेखी स्वरुपात पाठविण्याचे जाहिरातीत नमूद केले होते. कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आला होता.

१. जिल्हाधिकारी, भंडारा.
२. जिल्हा उद्योग केंद्र भंडारा.
३. जिल्हा परिषद, भंडारा.
४. उप-विभागीय अधिकारी, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, तुमसर ता. तुमसर जि. भंडारा.
६. पंचायत समिती, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, ५ वा मजला, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर
८. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. म.प्र.नि. मंडळ (मुख्यालय) सायन सर्कल, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१०. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालय भू-तल, पूर्व खंड, नवीन सचिवालय भवन सिव्हिल लाईन्स नागपूर-०१
११. मुख्याधिकारी नगरपरिषद, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा
१२. ग्रामपंचायत कार्यालय, हरदौली तह. तुमसर जि. भंडारा

**म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणीपूर्वी कोणतेही लेखी आक्षेप, निवेदन, सूचना प्राप्त झाल्या नाहीत,**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने दुपारी १.०० वाजता लोकसुनावणीचे कामकाज सुरू झाले. समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे, उप प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी प्रास्ताविकात लोकसुनावणीची कार्यपद्धती विषयी माहिती दिली आणि स्पष्ट केले की, जनसुनावणी समितीला शिफारस करण्याचा किंवा प्रकल्प मंजूर करण्याचा अधिकार नाही. प्राप्त लेखी आक्षेप, निवदने, सुचना, झालेले कामकाजाचे इतिवृत्त, व्हिडिओ रेकॉर्डिंगसह कार्यवाही पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मंत्रालयाकडे सादर केली जाईल. लोकसुनावणी समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तक व्यवस्थापक मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग यांना प्रस्तावित प्रकल्पांचे विस्तृत प्रस्तुतीकरण देण्यासाठी आमंत्रित केले.

मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग चे प्रतिनिधी यांनी मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग प्रकल्पाची सादरीकरणाव्दारे पार्श्वभूमीची विस्तृत माहिती दिली व मराठीत विस्तृत पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन देण्यास सांगितले. प्रस्तावित प्रकल्पाचा तपशील, सध्याची पर्यावरण स्थिती, प्रस्तावित प्रकल्पाचा परिणाम त्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनमध्ये मांडले.

लोकसुनावणीच्या समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थितांना प्रकल्पाबाबत त्यांचे मत, सूचना, विचार टीका-टीप्पणी आक्षेप व हरकती इत्यादी मांडण्याबाबत सूचित केले. मा. अध्यक्षा श्रीमती. बी. वैष्णवी (भा.प्र.से.) उप-जिल्हा दंडाधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर, यांना लोकांना विचारण्याबाबत आवाहन केले.

३) श्री. एस.एस. कुमार चौधरी हरदौली.

| अनु. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| ३. | मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्प आहे, या प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषण होऊ नये म्हणून काय उपाययोजना केली आहे ? ध्वनी प्रदूषणामुळे वृध्दांना काय त्रास होणार आहे? | प्रस्तापित प्रकल्पात मॅग्नेटिक सेपरेटर या प्रक्रियेमुळे आवाजाची निर्मिती होणे अपेक्षित आहे पण हे आवाज मॅग्नेटिक सेपरेटर भागातच मर्यादित राहील, यासाठी योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे. प्रकल्पामध्ये ध्वनी नियंत्रण करणारे यंत्र शेडमध्ये बसविण्यात येणार आहे. आवाज प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही त्यामुळे आवाजाचे प्रदूषण होणार नाही. त्याव्यतिरिक्त जे आवाज करणारे यंत्र त्यांना ध्वनी नियंत्रण करणारे यंत्र बसवियात येणार आहे. जे कामगार जास्त ध्वनी निर्माण करणाऱ्या यंत्राजवळ काम करतात त्यांच्या श्रवणक्षमतेची चाचणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांची टेस्टींग करण्यात येणार आहे. ध्वनीचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. हे मूल्यमापन केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या नियमानुसार करण्यात येणार आहे. |

४) श्री. रविंद्र बावणे (तंटामुक्ती अध्यक्ष) हरदौली.

| अनु. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| ४. | मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्प आहे, या प्रकल्पामुळे पाणी प्रदूषित होणार आहे काय ? | प्रस्तावित प्रकल्पातून पाण्याचे प्रदूषण होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली गेली आहे. प्रकल्पातून एक घनमीटर प्रतिदिवस इतके सांडपाणी निर्मिती होणार आहे त्या पाण्यावर सेप्टीक टँक व शोषखड्डयांमध्ये वैज्ञानिक पध्दतीने प्रक्रिया केली जाईल. जिगिंग प्रक्रियेतून २.५ घनमीटर प्रतिदिवस इतके औद्योगिक सांडपाणी निर्मिती अपेक्षित आहे. औद्योगिक सांडपाण्यावर संकलन टाकीमध्ये प्रक्रिया करून पुनर्वापर क्वेंचिंगसाठी वापरले जाणार आहे. प्रकल्पातून कुठल्याही प्रकारचे सांडपाणी सोडले जाणार नाही, असे आम्ही आश्वासन देतो. |

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टीप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत.**

**१) श्री. नरेंद्र चौधरी (उप-सरपंच) हरदौली.**

| अनु. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्प आहे, या प्रकल्पामुळे हवा प्रदूषण होऊ नये म्हणून काय-काय उपाययोजना केली आहे?<br><br>घनकचऱ्यासाठी काय काय उपाययोजना करणार आहात ? | प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या प्रदूषकांचे पर्यावरणदृष्ट्या वातावरणात व्यवस्थित विलीनीकरण होण्यासाठी भट्टीला ३० मीटर उंचीची चिमणी जोडण्यात येणार आहे. चिमणीतून बाहेर पडणाऱ्या पार्टिक्युलेटर मॅटर (सूक्ष्मकण) रोखण्यासाठी वेट स्क्रबर बसविण्यात येणार आहे. हवा प्रदूषण होऊ नये यासाठी अत्याधुनिक उपकरण लावण्यात येणार आहे, म्हणजे त्याव्दारे हवा प्रदूषण होणार नाही, याची योग्य ती दखल घेतली जाणार आहे.<br><br>घनकचऱ्याचे दोन भागात वर्गीकरण करण्यात येणार आहे, सुका आणि ओला कचरा. ओला कचरा आणि सुका कचरा अधिकृत विक्रेत्याला देण्यात येणार आहे. भट्टीतून निघणारी राख वीट उत्पादकाला देण्यात येणार आहे. ओला आणि सुका कचरा गोळा करण्यासाठी आवश्यक ठिकाणी कचरा संकलन डब्बे प्रदान केले जातील. कोणत्याही पध्दतीचा घनकचरा बाहेर टाकला जाणार नाही, याची काळजी घेतली आहे. |

**२) श्री. जगन्नाथ कटरे (पोलीस पाटील) हरदौली.**

| अनु. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| २. | मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्प आहे, या प्रकल्पामुळे किती लोकांना रोजगार मिळणार आहे? | सध्या प्रकल्पात अंदाजे २५ कामगार आहे. प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात अंदाजे ७ ते १० लोकांची गरज आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर परिचालन टप्प्यात किंवा प्रकल्प चालू असताना २५ कामगाराव्यतिरिक्त आणखी ५ ते १० लोकांची गरज लागणार आहे. आणि यात स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. |

५) श्री. कोमल रामटेके हरदौली.

| अनु. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| ५. | मे. श्री. साईनाथ मॅगनीज प्रोसेसिंग अँड ट्रेडिंग, प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा नवीन प्रकल्प आहे, या प्रकल्पात किमान किती झाडे लावणार आहात ? | वृक्षारोपण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक नियमानुसार केले जाईल. सध्या प्रकल्प प्रवर्तकाने त्यांच्या प्रकल्प क्षेत्रात सध्यस्थितीत ३० झाडे लावलेली आहेत. याव्यतिरिक्त कारखान्याच्या परिसरात एकूण ७५९ चौ.मी. हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे व त्या क्षेत्रात ५० ते ७५ झाडे लावण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त रस्त्याच्या आजूबाजूला झाडे लाऊन रस्त्याचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. |

श्रीमती. बी. वैष्णवी (भा.प्र.से.) उप-जिल्हा दंडाधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर, यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व सदर प्रस्तावित मॅगनीज गुणवत्ता सुधारणा प्रकल्पाचा विस्तार उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आली आहे, असे कळविले. यावेळी श्री. बी. डी. टेळे तहसीलदार, तुमसर यांनी घनकचऱ्याचे नियोजन कसे करणार आहात, आरोग्याचे कसे नियोजन आहे, प्रकल्पक्षेत्रात धान उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असल्यामुळे त्यावर काय परिणाम होणार आहे काय, इत्यादी प्रश्न उपस्थित केले असता,

प्रवर्तकाने घनकचऱ्यासाठी ग्रामपंचायतीला ५० हजार आर्थिक मदत देणार आहे. वेळोवेळी गावात आरोग्य शिबीरे घेण्यात येणाार आहे. श्वसनाचा त्रास होतो काय, आवाजाचा त्रास होतो काय, कोणाता आजार होतो काय हे वेळोवेळी तपासून त्यांच्या वैद्यकीय तपासण्या करण्यात येणार आहे. त्याशिवाय परिसरातील झाडे योग्य आहे की नाही, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, प्रकल्प व्यवस्थित चालू आहे की नाही आणि इतर कामे बघण्यासाठी एक समिती नेमण्यात येणार आहे. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागपूर, यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाच्या आजूबाजूला किमान १५० झाडे लावण्यास सांगितले असता, प्रकल्प प्रर्वतकाने होकार दिला.

श्रीमती. बी. वैष्णवी (भा.प्र.से.) उप-जिल्हा दंडाधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर, जन सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टीप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने यांची नोंद घेण्यात आली असून पुढच्या परवानगीसाठी पाठविण्यात येणार आहे, असे सांगून अध्यक्षीय समारोप केला. समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने जाहिर लोकसुनावणी संपली, असे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (बी. वैष्णवी भा.प्र.से.)<br>**उप-जिल्हा दंडाधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तुमसर. तथा जनसुनावणी अध्यक्षा** | (अशोक करे)<br>**प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती** | (हेमा देशपांडे)<br>**उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा व समन्वयक, लोक सुनावणी समिती** |